Reg. No. NP CITY/236/2018-20.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ८, अंक ४९ ] गुरूवार ते बुधवार, डिसेंबर ८-१४, २०२२/अग्रहायण १७-२३, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १०.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-५ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१०२ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११४८.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ११(१) अन्वये.**

क्रमांक अ.का.-भूसंपादन-हरसोडा-कावि-२३०९-२०२२.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या (खंड) (ई) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण दिनांक ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनूसार समूचित शासन असलेल्या, बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची -एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिनी (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमिन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनाकरीता (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये असे अधिसूचीत करण्यात येते की उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी, कलम-४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आह;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिका-यास विशेष परिस्थिती कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीचा किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

आणि ज्याअर्थी, तसेच उक्त अधिनियमाच्या कलम -११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मलकापूर यांना यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०२-हरसोडा-२०१५-१६, मौजे हरसोडा, तालुका मलकापूर, जिल्हा बुलडाणा.

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित वाहिती खालील क्षेत्र | अंदाजित पोटखराब क्षेत्र | अंदाजित संपादित एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | हे. आर | हे. आर | हे. आर |
| १ | १७६ | ० १४ | ० ०३ | ० १७ |
| २ | १७५ | ० ०३ | ० ०१ | ० ०४ |
| ३ | १७४ | ० १७ | ० ०३ | ० २० |
| ४ | १७३ | ० ०७ | ० ०३ | ० १० |
| ५ | १७२ | ० ०६ | ० ०३ | ० ०९ |
| ६ | १७१ | ० १४ | ० ०६ | ० २० |
| ७ | १५५ | ० १५ | ० ०३ | ० १८ |
| ८ | १५६ | ० १८ | ० ०३ | ० २१ |
| ९ | १५७ | ० २४ | ० ०० | ० २४ |

**अनुसूची-एक** चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | हे. आर | हे. आर | हे. आर |
| १० | १५८ | ० १६ | ० १२ | ० २८ |
| ११ | १५९ | ० १२ | ० ०५ | ० १७ |
| १२ | १५९ | ० १२ | ० ०६ | ० १८ |
| १३ | १८२ | ० १७ | ० ०६ | ० २३ |
| १४ | १८३ | ० ५४ | ० १८ | ० ७२ |
| १५ | १८३ | ० २४ | ० ०९ | ० ३३ |
| १६ | १७७ | ० १३ | ० ०२ | ० १५ |
| १७ | १७९ | ० ०० | ० ०२ | ० ०२ |
| १८ | १७८ | ० ०२ | ० ०० | ० ०२ |
| १९ | १७८ | ० ०१ | ० ०० | ० ०१ |
| | एकूण बेरीज . . | २ ६९ | ० ८५ | ३ ५४ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :– हरसोडा-सावरगाव-चाहु मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरण.

संपादनाचे प्रयोजन :– मौजे हरसोडा-सावरगाव-चाहु मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरणाकरिता खाजगी जमिनींचे भूसंपादन करणेबाबत.

प्रकल्प कार्याचे वर्णन :– कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव.

समाजाला मिळणारे लाभ :– या प्रकल्पामुळे मौजे हरसोडा, ता. मलकापूर, जि. बुलडाणा येथील मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरणामुळे गावातील सुविधा वाढतील व जिवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारण होईल.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदरचा प्रकल्प हा रस्त्याचे मजबुतीकरणासाठी व डांबरीकरणासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमीनीवर असून शेतक-यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची-चार**

**सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश**

नविन भूसंपादन कायदा, २०१३ कलम (६) मध्ये अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे (प्रमाणपत्र सहपत्रित केले आहे.) तसेच SIA प्रमाणपत्रामध्ये नमूद केंद्र शासन कायदा प्रकरण ०२ कलम ०६ (२) चे परंतुकानुसार Provided that in respect of Irrigation project where the Process of Environment Impact Assesment if required under the Provision of any other law for the time being in face, the provision if the act relation to social impact Assessment shall not apply असे नमूद केले असल्याने सामाजिक परिणाम निर्धारण मधून सूट मिळण्यास सदर प्रकरण पात्र आहे.

**अनुसूची–पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यास आलेल्या अधिका-याचे पदनाम :– निरंक

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :– निरंक

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचा तपशील :– निरंक

**टीप :–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मलकापूर येथे पाहता/निरीक्षण करता येईल.

बुलडाणाः **डॉ. ह. पि.तुम्मोड,**

दिनांक १७ नोव्हेंबर २०२२. जिल्हाधिकारी, बुलडाणा.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११४९.

**अपर जिल्हादंडाधिकारी, यांजकडून**

**संदर्भः-** पोलीस अधिक्षक (ग्रामीण), अमरावती यांचे पत्र क्र.जि.वि.शा.-४११०-२०२२, दि. १७ नोव्हेंबर, २०२२,

**आदेश**

क्रमांक कलि-एमएजी-डे-२७-कावि-७७९-२०२२.–

उपरोक्त संदर्भान्वये सध्याच्या राजकीय घडामोडीचा पार्श्वभूमीवर काही समाजकंटक क्षुल्लक कारणावरुन वाद निर्माण करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करु शकतात. तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी हे एकमेंकांविरोधात बयानबाजी व पोस्टरबाजी करीत असल्यामुळे स्थानिक स्तरावर त्यांचे कार्यकर्ते समोरासमोर येऊन वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२२ रोजी ग्रामपंचायत निवडणूक करिता आचार संहिता लागू झाली असून अमरावती ग्रामीण घटकांतर्गत २५७ ग्रामपंचायतमध्ये दिनांक १८ डिसेंबर, २०२२ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांचे स्थानिक प्रचाराकरीता सक्रिय झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विविध वस्तूच्या दरवाढीमुळे स्थानिक संघटना तसेच विविध मागण्या व प्रश्नांवर मुस्लीम संघटना, हिंदू संघटना, शेतकरी संघटन व इतर संघटना, पक्ष अचानक आंदोलन करु शकतात. त्याचप्रमाणे मराठा/धनगर/ओबीसी समाजातर्फे आरक्षण करीता आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी, वरील बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत राहावी या दृष्टीने सुरक्षिततेसाठी उपाय योजना करण्याचे दृष्टीने मी, विवेक घोडके, अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र पोलीस अधिसूचना व आदेशान्वये खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

**अधिसूचना मुं.पो. कायदा, १९५१ चे कलम ३७(१)**

(१) शस्त्र तसेच तलवार, भाला, चाकू, लाठी व इतर वस्तूमुळे जीवीत हानी होवू शकते असे शस्त्र.

(२) विस्फोटकाचे व कच्च्या मालाची वाहतूक करणे.

(३) दगड, विटा, इ. क्षेपणास्त्राचा वापर करणे (गोळा करणे)

(४) माणसाच्या/जमावाच्या एकत्रीकरण करण्यास, पुतळ्याचे प्रदर्शन करण्यास.

(५) जाहीररित्या ओरडणे, गाणे संगीत वाजविणे, बिभीस्त चाळे करणे, अंगविक्षेप करणे. चित्र विचीत्र कृती करणे, छायाचित्रांचे प्रदर्शन करणे.

**अधिसूचना मुं.पो. कायदा, १९५१ चे कलम ३७(३)**

कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी, धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदी घालीत आहे.

महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम (१) अन्वये जारी केलेल्या म.पो.का. च्या ३७ (२) अन्वये जारी केलेल्या आदेश दि. १९ नोव्हेंबर, २०२२ चे ००.०१ वा. पासुन ते दि. ०३ डिसेंबर, २०२२ चे २४.०० वा. पर्यंत अमरावती जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून ग्रामीण भागात लागू राहील.

उपरोक्त कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या अधिसुचनाचे उल्लंघनाबाबत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) अन्वये कारवाई करण्यात येईल. तसेच कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघनाबाबत संबंधितांवर उचित कायदेशिर कारवाई करीता महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ च्या कलम (३) अन्वये करण्यात येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय, निमशासकीय, कर्मचारी, लग्न, नाटक, तमाशे, धार्मिक शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना लागू होणार नाही. अंत्ययात्रेच्या व्यतिरिक्त कोणत्याही मिरवणुका/कोणत्याही रस्ता/ओळी मधून कोणत्याही पोलीस स्टेशन अधिका-यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझे व सही व शिक्क्यानिशी आज दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी जारी केले.

अमरावती :
दिनांक १८ नोव्हेंबर २०२२.

**विवेक घोडके,**
अपर जिल्हादंडाधिकारी,
अमरावती.

अ.-एक-२ (१७६२).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.